मराठी
# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# महापालिकेच्या वतीने राष्ट्रीय आपत्ती निवारण दिवस साजरा!

## नागरिकांना आपत्तीजन्य परिस्थिती हाताळण्याबाबत मार्गदर्शन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि अग्निशमन विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि. १३) राष्ट्रीय आपत्ती निवारण दिवस साजरा करण्यात आला.



यावेळी नागरिकांना आपत्तीजन्य परिस्थिती हाताळण्या बाबत मार्गदर्शन करण्यात आले. महापालिका क्षेत्रातील फ क्षेत्रीय कार्यालय, ब क्षेत्रीय कार्यालय, ड क्षेत्रीय कार्यालय, जिल्हा रुग्णालय सांगवी या ठिकाणी अग्नि सुरक्षितता व आपत्ती जन्य परिस्थितीत बचाव प्रणाली यासंबंधी मार्गदर्शन करून जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. यावेळी मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहीवाल, अग्निशमन अधिकारी बाळासाहेब वैद्य, गौतम इंगवले, विजय घुगे, लीडिंग फायरमन विकास नाईक व अग्निशमन कर्मचारी, पालिकेचे अधिकारी, नागरिक उपस्थित होते. १४ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर या कालावधीत शाळा, महाविद्यालय, औद्योगिक वसाहती, कार्यालय, हाउसिंग सोसायटी, मॉल अशा ठिकाणी अग्निशमन व आपत्ती विषयक आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि अग्निशमन दलाच्या माध्यमातून प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# जलतरण गॅस गळती प्रकरणी गुन्हा दाखल!

## सुमित स्पोर्ट्स अँड फिटनेस इक्विपमेंटच्या संबंधित व्यक्ती यांच्या विरोधात गुन्हा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** कासारवाडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलावात क्लोरिन गॅस लिकेज झाल्याची घटना मंगळवारी (दि. १०) घडली. याप्रकरणी गुरुवारी (दि. १२) संबंधित एजन्सी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमित स्पोर्ट्स अँड फिटनेस इक्विपमेंट, चिंचवडचे संबंधित व्यक्ती यांच्या विरोधात भारतीय दंड विधान कलम ३३८, ३३६, २८४, २८७ नुसार गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी ह क्षेत्रीय कार्यालयातील क्रीडा पर्यवेक्षक जयश्री साळवे यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मंगळवारी सकाळी कासारवाडी येथे असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलावात एकजण बेशुद्ध अवस्थेत पडला. त्यानंतर अनेकांना श्वास घेण्यासाठी त्रास होऊ



लागला. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता पाण्यामध्ये क्लोरीन गॅसची गळती झाली असल्याचे समोर आले. जलतरण तलावातील पाणी शुद्ध करण्यासाठी क्लोरीन गॅस वापरला जातो.

त्याच्या सिलेंडरला खालील बाजूला छिद्र पडून गॅसची पाण्यात गळती झाली होती. यामुळे हा प्रकार घडला. या घटनेत अनेकांना श्वास घेण्यास त्रास झाला. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त विवेक पाटील, सहायक आयुक्त सतीश कसबे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर जाधव आदि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी देखील घटनास्थळी आणि रुग्णालयात भेट देऊन नागरिकांची विचारपूस केली. सुमित स्पोर्ट्स अँड फिटनेस इक्विपमेंट, चिंचवडचे संबंधित व्यक्ती या घटनेसाठी कारणीभूत ठरल्याने त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

# चिखलीकरांना आंद्रा प्रकल्पाच्या पाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
चिखली आणि परिसरातील सुमारे ९० हजार नागरिकांच्या पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून थेट पाईपद्वारे पाटीलनगर येथील जलकुंभात पाणी दिले जाणार आहे. त्यामुळे पवना आणि आंद्रा प्रकल्पातील एकत्रित पाणी मिळाल्यामुळे या भागातील पाणी समस्या निकालात निघणार आहे.



### आंद्रा पाणी वितरण व्यवस्था अंतिम टप्प्यात

**» समाविष्ट गावांतील पाणी पुरवठा सक्षम करण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी व्हीजन-२०२० अंतर्गत आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पाचे काम हाती घेतले. त्यातील आंद्रा प्रकल्पाचे १०० एमएलडी पाणी चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात दाखल झाले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते या जलशुद्धीकरण केंद्राचे लोकार्पण करण्यात आले होते. सदर पाणी वितरण व्यवस्था अंतिम टप्प्यात आहे. चिखली, चऱ्होली, मोशी, डुडूळगाव, जाधववाडी, दिघी आदी गावांतील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे समाविष्ट गावांचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी सुटण्यास मदत होईल.**

**“पिंपरी-चिंचवड शहरासह माझ्या भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांत भविष्यातील ३० वर्षांच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन पाणी पुरवठा यंत्रणा सक्षम करण्याचा आमचा निर्धार आहे. आंद्रा प्रकल्पातील पाणी शहरात दाखल झाले आहे. तसेच, भामा आसखेड प्रकल्पाचे कामही प्रगतीपथावर आहे. चिखलीसह समाविष्ट गावातील पाणी पुरवठा सक्षम करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही केली आहे. लवकरच आंद्राचे पाणी पाटीलनगर येथील पाण्याच्या टाकीत दाखल होईल. त्यामुळे पाणी समस्या सोडवण्यास मदत होईल. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात अडीच वर्षे शहरातील विविध प्रकल्प रखडले. विकासकामे प्रलंबित राहीली. पण, आता महायुतीच्या सत्ताकाळात विकासकामे मार्गी लागत आहेत, ही समाधानाची बाब आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली शहराचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.**

**– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

चिखली आणि परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी प्रश्नाबाबत स्थानिक नागरिकांनी अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. याबाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आणि हा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्याबाबत उपाययोजना करण्याची सूचना प्रशासना केली होती. पाटीलनगर येथे महापालिका प्रशासनाने २० लाख लीटर क्षमतेचा जलकुंभ उभारला आहे. या टाकीमध्ये पवना प्रकल्पातील रावेत बंधाऱ्यातून सुमारे १६ एमएलडी पाणी दिले जाते. एक दिवस २० ते २२ तास आणि दुसऱ्या दिवशी तीन ते चार तास पाणी पुरवठा होतो. आता प्रशासनाने आंद्रा प्रकल्पातील पाण्यासाठी चिखली येथे नवीन जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. त्यातील पाणी पाटीलनगर येथील पाण्याच्या टाकीत आणण्यासाठी ६०० एमएम पाईपलाईन टाकण्यात आली आहे. त्यामुळे पवना आणि आंद्रा अशा दोन्ही प्रकल्पाचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे पाणी पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, महापालिका प्रशासनाच्या वतीने आंद्राचे पाणी पाटीलनगर टाकीत आणण्यासाठी पंप बसवण्यात येणार आहे. तो पंप जलशुद्धीरकण केंद्रात दाखल झाला. यावेळी भाजपाचे माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, अंकुश मळेकर, विनायक आबा मोरे,पांडुरंग साने, संदिप शेलार आदी उपस्थित होते. आंद्रा प्रकल्पातून अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यामुळे पाण्याची टाकी भरण्यास मदत होईल. टाकीसाठी सध्या एक पंप आहे. आणखी एक पंप उपलब्ध करण्याबाबत प्रशासन प्रयत्न करीत आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त पाणीसाठा होण्यास मदत होईल. चिखली गावठाण, रामदासनगर, नागेश्वर विद्यालय, रामदास नगर टप्पा, महादेवनगर, भांगरे कॉलनी, धर्मराज नगर, शेलारवस्ती, पाटीलनगर, देहू-आळंदी रस्ता, राम मंदिर डिफेन्स कॉलनी या भागातील पाणी पुरवठा सक्षम होणार आहे.

# राज्यातील १०४ पोलीस निरीक्षकांना बढती!

## पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील सहा जणांचा समावेश

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
गृह विभागाने पोलीस निरीक्षकांना नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोठे गिफ्ट दिले आहे. राज्यातील १०४ पोलीस निरीक्षकांना पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त पदावर बढती देण्यात आली आहे. याबाबतचे आदेश शुक्रवारी (दि. १३) देण्यात आले आहेत. यामध्ये पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील सहा अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

राज्यातील पोलीस निरीक्षकांच्या बढत्या मागील अनेक दिवसांपासून रखडल्या होत्या. अनेक अधिकारी बढतीच्या आदेशाची आतुरतेने वाट पाहत होते. गृह विभागाने आज १०४ अधिकाऱ्यांच्या बढतीची यादी काढली आहे.

या बढतीमध्ये पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील सहा अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

हिंजवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. विवेक मुगळीकर यांना



बढती मिळाली असून त्यांची पिंपरी-चिंचवड शहरातच पदस्थापना करण्यात आली आहे.

भोसरीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर जाधव आणि तळेगाव (उहळपलहुरव) दाभाडेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यवान माने यांची पोलीस उप अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथे बढतीने पदस्थापना करण्यात आली आहे. निगडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रंगनाथ उंडे यांना देखील बढती मिळाली आहे. त्यांना पुणे शहर पोलीस दलात सहायक पोलीस आयुक्त पदावर बढती मिळाली आहे. नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक रवींद्र जाधव हे बढतीने उपविभागीय पोलीस अधिकारी, गडचांदूर, जि. चंद्रपूर येथे गेले आहेत. पोलीस निरीक्षक दीपक शिंदे यांना बृहन्मुंबई येथे सहायक पोलीस आयुक्त पदावर बढती मिळाली आहे.

शहरातील सहा अधिकाऱ्यांना बढती मिळाली. त्यातील पाचजण शहरातून बाहेरील घटकात गेले. अनिल कोळी, मुगुटलाल पाटील हे अधिकारी शहरात सहायक पोलीस आयुक्त पदावर बढतीने आले. तर डॉ. विवेक वसंतराव मुगळीकर यांना पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय हा घटक मिळाला आहे.

# मोबाईल टॉयलेटच्या निविदेसाठी घाई!

## निविदा भरण्यापासून कोणालाही रोखले जात नाही

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
गणेशोत्सवाच्या काळात ४४ लाख रुपये खर्च करून मोबाईल टॉयलेटची निविदा काढण्यात आली. या सेवेत त्रुटी असल्याने त्याच्या अनेक तक्रारी गेल्या. त्यानंतर आता पुढील वर्षभरासाठी आणखी एक २५ लाख रुपयांची निविदा काढण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागात गडबड सुरु आहे.
तसेच या निविदेत स्पर्धा होऊ नयेत यासाठी ठेकेदारांना तुम्ही निविदा भरू नका असे निरोप जात असल्याने याची प्रशासनातही चर्चा रंगली आहे. महापालिकेतर्फे पालखी सोहळा, गणेशोत्सव या काळात नागरिकांच्या सोईसाठी मोबाईल टॉयलेटची




व्यवस्था केली जाते. यंदा गणेशोत्सवासाठी ठेकेदार नियुक्त केला होता, पण त्याने व्यवस्थित काम न केल्याने त्याला ५ लाख रुपयांचा दंड केला व त्याच्याकडून हे काम काढून घेण्यात आले. त्यानंतर गणेशोत्सवाच्या काळात शहराच्या विविध भागात ४०० मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली. या प्रत्येक टॉयलेटला प्रतिदिन ११०० रुपये भाडे होते. गणेशोत्सवात यासाठी ४४ लाखाचा खर्च झाला आहे. पण अनेक टॉयलेट स्वच्छ नव्हती, स्वच्छता गृहांच्या दाराला कडी नव्हती, परिसरात प्रकाश व्यवस्था नव्हती, स्वच्छतागृहाबाहेर पाण्यासाठी ड्रम ठेवला असला तरी पाणी घेण्यासाठी छोटे बकेट, मग व्यवस्था नव्हती. त्यामुळे ठेकेदाराच्या कार्य पद्धतीवर टीका करत याची चौकशी करण्याची मागणी केली आहे. गणेशोत्सवानंतर भविष्यात कोणताही उत्सव नसतानाही २५ लाख रुपयांची निविदा काढली आहे. त्यासाठी ७ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर अशी मुदत आहे. या अल्पमुदतीच्या निविदा काढताना याचे अधिकार विभाग प्रमुखांकडेच असले पाहिजेत याची काळजी घेत २५ लाखापेक्षा कमी रकमेची निविदा काढली आहे. आता निविदेची गरज काय आहे?, ही निविदा पुढच्या पालखी सोहळा, गणेशोत्सवासाठी असेल का?, सध्या कोणतीही गडबड नसताना अल्प मुदतीची निविदा का काढली? याबाबत अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता याची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. उपायुक्त संदीप कदम म्हणाले, 'वारीच्या काळात १५ लाख तर गणेशोत्सवासाठी ४४ लाख रुपयांची निविदा होती.


### मंत्र्याच्या नावाने दबाव

» प्रशासनावर वचक असलेला नेता अशी ओळख असलेल्या एका मंत्र्यांच्या पीएच्या माध्यमातून ही निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी हालचाल सुरु आहे. गणेशोत्सवातही मंत्र्याच्या पीएने अनेकांवर दबाव आणला होता. आता या २५ लाखाच्या निविदेतही ठेकेदारांना मंत्र्यांचे नाव घेऊन तुम्ही निविदा भरू नका असे कर्मचारी फोन करत आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# २७ वर्षांनी क्रिकेटचे सामने!

## तिकीट ब्लॅक होत असल्याने चाहते नाराज

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
२७ वर्षांनंतर पुण्यामध्ये क्रिकेट विश्वचषकाचे सामने होणार आहेत. १९ ऑक्टोबर रोजी भारत विरुद्ध बांगलादेश क्रिकेटचा सामना पुण्यातील एमसीए मैदानावर होणार आहे. असं असलं तरी क्रिकेट चाहत्यांमध्ये मात्र नाराजी असून ऑनलाईन तिकीट मिळत नसल्याने अनेक क्रिकेट चाहते गहुंजे क्रिकेट स्टेडियम परिसरात गर्दी करत आहेत.
तिकीट मिळेल या आशेने चाहते स्टेडियम परिसरात दाखल होत असले तरी तिकीट हे केवळ ऑनलाईन पद्धतीनेच उपलब्ध होणार आहे. नाराज क्रिकेटच्या



चाहत्यांनी क्रिकेट सामन्यांची तिकीट ब्लॅक होत असल्याचा आरोप करत थेट बीसीसीआय आणि एमसीएला प्रश्न विचारला आहे. पुण्यातील एमसीए क्रिकेट मैदानावर विश्वचषकाचे पाच सामने खेळवले जाणार आहेत. पहिला क्रिकेटचा सामना हा भारत विरुद्ध बांगलादेश असा रंगणार आहे. त्यानंतर इतर देशांचे सामने खेळवले जातील. भारत विरुद्ध बांगलादेश या क्रिकेट सामन्याचे तिकीट ऑनलाईन पद्धतीने न मिळाल्यामुळे अनेक क्रिकेट चाहते नाराज आहेत. ते स्टेडियम परिसरात हजेरी लावत आहेत. तिकीट मिळतं की नाही याची चौकशी करत आहेत. प्रत्यक्षात मात्र स्टेडियममध्ये तिकीट विक्री नाही. केवळ ऑनलाईन तिकीट विक्री करण्यात येते आहे. परंतु, या ठिकाणी अनेक क्रिकेट प्रेमींनी तिकिटांचा ब्लॅक, काळा बाजार होत असल्याचा आरोप केला आहे. याचा थेट फटका प्रेक्षकांना बसला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अवघ्या बाराशे रुपयांचं तिकीट हजारो रुपयांना विक्री करत असल्याचा आरोप क्रिकेट चाहत्यांनी केला आहे आणि याचा फटका चाहत्यांना बसत असून त्यांनी बीसीसीआय आणि एमसीएबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. अवघ्या देशभरात विविध राज्यांत मैदानांवर विश्वचषकाचे क्रिकेटचे सामने खेळवले जात आहेत. असा दाखला देत तिकिटांसंदर्भात गलथान कारभार झाल्यानेच स्टेडियममध्ये गर्दी होत नाही, असा आरोप त्यांनी केला आहे.

# ३४ गावांतील सांडपाणी वाहिन्यांचे काम निकृष्ट?

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमधील सांडपाणी वाहिन्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याच्या आरोपानंतर शासकीय अभियांत्रिकी विद्यापीठामार्फत या कामांची तपासणी करण्यात येणार आहे. मुंबई येथील बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे गावातील सांडपाणी वाहिन्यांच्या कामाची पोलखोल होण्याची शक्यता आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनात खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर यांनी यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. या कामांची उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली होती. विधीमंडळातील आश्वासनासंदर्भातील पूर्तता करण्यासंदर्भात मुंबईत बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांनी दिली. महापालिका हद्दीमध्ये ऑक्टोबर २०१७ मध्ये ११ गावांचा आणि त्यानंतर जुलै २०२१ मध्ये २३ गावांचा अशा एकूण ३४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी समाविष्ट ११ गावांसाठी महापालिकेने ४२५ कोटींचा सांडपाणी वहन व्यवस्था आराखडा केला असून त्याला स्थायी समितीनेही मंजुरी दिली होती. या गावातील २०४७ सालापर्यंतची लोकसंख्या गृहीत धरून हा आराखडा करण्यात आला आहे. त्यानुसार ११ गावांमध्ये १८३ किलोमीटर लांबीच्या सांडपाणी वाहिन्या टाकण्याची कामे केली.

# पदवीचे विद्यार्थी आता कामाला लागणार!

## ६० ते १२० तासांची इंटर्नशीप बंधनकारक

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पदवीपूर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना सक्तीच्या कार्यप्रशिक्षणाबाबतच्या (इंटर्नशीप) मार्गदर्शक सूचनांचा मसुदा प्रसिद्ध केला. त्यानुसार तीन वर्षे पदवीच्या विद्यार्थ्यांना ६० ते १२० तास, तर चार वर्षे पदवीच्या विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प पूर्ण करावा लागणार असून, त्यातून विद्यार्थी साधारणपणे १२ श्रेयांक मिळवू शकतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये उच्च शिक्षणातील पदवीपूर्व स्तरावर विद्यार्थ्यांना अनुभवातून शिक्षण आणि संशोधनावर भर देण्यात आला आहे. त्या अनुषंगाने यूजीसीने 'पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी कार्यप्रशिक्षण, संशोधन कार्यप्रशिक्षण' या मार्गदर्शक सूचनांचा मसुदा प्रसिद्ध केला. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक ज्ञान, कार्यानुभव, अनुभव असणे आवश्यक असते. मात्र विद्यार्थ्यांकडे त्याचा अभाव असल्याने नोकरी मिळवण्यात अनेक अडचणी येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षम कौशल्ये वाढवणे, त्यांची क्षमतावृद्धी, व्यावसायिक कार्यानुभव, आत्मविश्वास वाढवणे, संशोधनात रस निर्माण करणे या दृष्टीने कार्यप्रशिक्षण हा उपाय ठरू शकतो, असे मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आले आहे. सध्या तंत्रशिक्षण आणि काही व्यावसायिक अभ्यासक्रम वगळता पदवीपूर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना कार्यप्रशिक्षणाची सक्ती नाही. मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांमध्ये रोजगारक्षमता वाढवणे, संशोधन क्षमता निर्माण करण्यासाठी पदवीपूर्व स्तरावर दोन प्रकारच्या कार्यप्रशिक्षणाचा समावेश आहे. त्यात तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना ६० ते १२० तासांचे कार्यप्रशिक्षण पूर्ण करावे लागेल, तर चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम



करणाऱ्या विद्यार्थ्यांना आठव्या सत्रात संशोधन कार्यप्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे. उच्च शिक्षण संस्थांना स्थानिक उद्योग, संशोधन संस्थांशी कार्यप्रशिक्षण, संशोधनासाठी सामंजस्य करार करावा लागेल. व्यापार आणि कृषी क्षेत्र, अर्थव्यवस्था आणि बँकिंग, आर्थिक सेवा, विमा, वाहतूक, माहिती तंत्रज्ञान, हस्तकला, कला, डिझाइन, संगीत, आरोग्यसेवा आणि जीवन विज्ञान, पर्यटन आणि आतिथ्यसेवा, पर्यावरण, वाणिज्य आणि व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना कार्यप्रशिक्षण घेता येईल किंवा संशोधन करता येईल. कार्यप्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांची उपस्थिती, त्यांनी मिळवलेली कौशल्य, संशोधनातील खरेपणा आणि नावीन्यपूर्ण योगदान, संशोधनाचे महत्त्व अशा निकषांवर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केले जाईल. त्यात संशोधन कार्यप्रशिक्षण पर्यवेक्षकांकडून किंवा उच्च शिक्षण संस्थेतील चर्चासत्रात सादरीकरण, मुलाखतीद्वारे त्यांचे मूल्यमापन करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मार्गदर्शक सूचनांमध्ये उच्च शिक्षण संस्था, कार्यप्रशिक्षण देणारी संस्था, उच्च शिक्षण संस्थेतील समन्वयक, कार्यप्रशिक्षण समन्वयक अशा प्रत्येक घटकाच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या आहेत. प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेत संशोधन विकास कक्षाची स्थापना करावी लागेल. तसेच कार्यप्रशिक्षणाची प्रक्रिया सुलभरित्या राबवली जाण्यासाठी या कक्षात समन्वयाचीही नेमणूक किंवा सुविहित यंत्रणा निर्माण करावी लागेल. कार्यप्रशिक्षण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याची शिफारसही मार्गदर्शक सूचनांमध्ये करण्यात आली आहे. यूजीसीने जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या मसुद्यावर हरकती-सूचना मागवण्यात आल्या आहेत. त्यासाठी १२ नोव्हेंबरपर्यंतची मुदत असल्याचे यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी परिपत्रकात नमूद केले.

### संशोधनासाठी सामंजस्य करार

**» सध्या तंत्रशिक्षण आणि काही व्यावसायिक अभ्यासक्रम वगळता पदवीपूर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना कार्यप्रशिक्षणाची सक्ती नाही. मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांमध्ये रोजगारक्षमता वाढवणे, संशोधन क्षमता निर्माण करण्यासाठी पदवीपूर्व स्तरावर दोन प्रकारच्या कार्यप्रशिक्षणाचा समावेश आहे. त्यात तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना ६० ते १२० तासांचे कार्यप्रशिक्षण पूर्ण करावे लागेल, तर चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना आठव्या सत्रात संशोधन कार्यप्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे. उच्च शिक्षण संस्थांना स्थानिक उद्योग, संशोधन संस्थांशी कार्यप्रशिक्षण, संशोधनासाठी सामंजस्य करार करावा लागेल.**

# पालकमंत्री पद गेल्यानंतर चंद्रकांत पाटील यांनी मौन सोडले

## मोठ्या कामासाठी केलेली ही एक छोटी तडजोड : चंद्रकांत पाटील

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पालकमंत्री पद गेले म्हणून नाराज होण्याचे कोणतेही कारण नाही. मोठ्या कामासाठी केलेली ही एक छोटी तडजोड आहे, अशी सारवासारव राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री, माजी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी येथे शुक्रवारी केली. राष्ट्रवादीमधील फुटीनंतर अजित पवार त्यांच्या समर्थक आमदारांच्या गटासह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले आहेत.



सत्तेत सहभागी झाल्यानंतर पुण्याचे पालकमंत्री होण्यासाठी अजित पवार यांनी आग्रही भूमिका घेतली होती. अजित पवार आणि चंद्रकांत पाटील यांच्यात शीतयुद्धही रंगले होते. सत्तेतील नव्या मित्रासाठी झळ सोसत अजित पवार यांच्यासह त्यांच्या आमदारांना विविध जिल्ह्याचे पालकमंत्री करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. यापार्श्वभूमीवर बारामती लोकसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना चंद्रकांत पाटील यांनी त्याबाबत भाष्य करताना सारवासारव केली. पुण्याचे पालकमंत्रीपद गेल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली. मात्र कोणीही नाराज होण्याचे कारण नाही. एका मोठ्या कामासाठी केलेली ही एक छोटी तडजोड आहे, असे पाटील यांनी स्पष्ट केले. दरम्यान, बारामती लोकसभा निवडणूक जिंकणयाची आता संधी आहे. यावेळी जिंकलो नाही तर पुन्हा कधीच नाही, असेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, बारामती लोकसभा मतदार संघ काबीज करमय़ासाठी मतभेद बाजूला ठेवून काम करावे लागेल. पालकमंत्री पद सोडण्यासाठी मी केलेली तडजोड ही राज्यात ४८ पैकी ४५ जागा निवडून आणण्यासाठी आणि नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठीची आहे. वरिष्ठ नेत्यांनी घेतलेल्या निर्णयाचा सर्वांनी आदर केला पाहिजे. पालाकमंत्री नसलो तरी व्हीआयपी सर्किट हाऊसमधील माझी दोन्ही कार्यालये सुरूच राहणार आहेत. मी पूर्वीसारखाच पुण्यात काम करणर आहे. सर्वांना भेटणार आहे.

### बारामती निवडणूक जिंकणयाची संधी

**» बारामती लोकसभा निवडणूक जिंकणयाची आता संधी आहे. यावेळी जिंकलो नाही तर पुन्हा कधीच नाही, असेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, बारामती लोकसभा मतदार संघ काबीज करमय़ासाठी मतभेद बाजूला ठेवून काम करावे लागेल.पालकमंत्री पद सोडण्यासाठी मी केलेली तडजोड ही राज्यात ४८ पैकी ४५ जागा निवडून आणण्यासाठी आणि नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठीची आहे.**